क्रमांक ६३७५ /ड-३ (समिती समन्वय)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १४ मे, २०२५.

: : परिपत्रक : :

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०२४- २०२५ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या सर्व समित्यांच्या उद्‌घाटनाचा एकत्रित कार्यक्रम सोमवार, दिनांक १९ मे, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता मध्यवर्ती सभागृह, चौथा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात येत आहे. कार्यक्रमाबाबत ड-३ (अंदाज समिती) कक्षाकडून सर्व सदस्यांना कळविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाला सदस्यांना उपस्थित राहणे सोईचे व्हावे म्हणून सर्व समित्यांच्या बैठका उक्त दिवशी दुपारी १.३० नंतर आयोजित करण्याबाबत मा. समिती प्रमुखांच्या मान्यतेने निर्णय घ्यावा व तसे संबंधित समिती कक्षाने समिती सदस्यांना पत्र, **SMS**, ई-मेल तसेच दुरध्वनीद्वारे कळवावे. समिती कक्ष व वेळ यांच्या सुसूत्रतेसाठी ड-३ (अंदाज समिती) कक्षात नोंदवही ठेवलेली आहे.

सर्व समिती कक्ष व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

(दामोदर गायकर)
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**याची प्रत :**

१) या सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व समिती कक्ष.
२) सचिव (१), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
३) सचिव (२), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
४) सचिव (३), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) सचिव (४), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) संगणक कक्ष.